# उत्कृष्ट कार्य

उत्कृष्ट कार्य

# पोलिसांच्या प्रयत्नामुळे तो सुखरूप घरी

## पुण्यातून बेपत्ता झालेली व्यक्ती जेजुरीत आढळली

**पुणे, ता. २१ :** मित्रासमवेत जेवण केल्यानंतर बेपत्ता झालेल्या एका नागरिकाचा पोलिसांनी शोध घेऊन बारा दिवसांनी त्याच्या कुटुंबीयांमध्ये सुखरूप पोचविले. आनंदाने भारावलेल्या कुटुंबीयांनीही डेक्कन पोलिसांचे आभार मानून, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

राकेश रामखिलामन पांडे (वय ४५, रा. जयसिंगनगर, मध्य प्रदेश) हे सात जुलै रोजी त्यांच्या मित्रासमवेत नळस्टॉप चौकामध्ये जेवण्यासाठी आले होते. जेवण झाल्यानंतर ते दोघेही डेक्कनच्या दिशेने पायी आले. त्यानंतर खिलारेवाडी येथील सेंट्रल मॉलजवळ दोघेही थांबले. थोड्या वेळाने राकेश पांडे तेथून बेपत्ता झाले. त्यामुळे चार दिवसांनी त्यांचे भाऊ ओंकार पांडे (वय ४२) यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार दिली होती.

दरम्यान, पोलिस निरीक्षक दीपक लगड यांनी फौजदार स्वप्नाली निकम, संदीप मोरे, सहायक फौजदार संजय गुरव, संजय मेमाणे, पोलिस कर्मचारी रवींद्र माने, रामदास गद्रे, राजेश सावंत, किरण कालेकर यांना पांडे यांचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार, पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पांडे यांचा डेक्कन परिसरासह प्रमुख चौक, गर्दीच्या ठिकाणी शोध घेतला. दरम्यान, सहायक फौजदार गुरव यांना बेपत्ता असलेली व्यक्ती जेजुरी येथे असल्याची खबर मिळाली. त्यानंतर डेक्कन पोलिसांच्या पथकाने जेजुरी येथे जाऊन पांडे यांना सुखरूप डेक्कन पोलिस ठाण्यात आणले.



**डेक्कन पोलिस ठाणे : बेपत्ता झालेल्या राकेश पांडे यांचा जेजुरी येथे शोध घेऊन, त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्त करताना पोलिस कर्मचारी.**

पुढारी – दि. २१ जुलै, २०१९

# फुलारी यांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार

## खाकी वर्दीतल्या निसर्गप्रेमीचा सन्मान

**पुणे : प्रतिनिधी**

पोलिस दलात काम करत असताना कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत चोख भूमिका पार पाडत आपल्या एखाद्या छंदाच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात किती उल्लेखनीय काम करता येऊ शकते, याचे उत्कृष्ट उदाहरण पुणे शहर पोलिस दलातील अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी यांनी निर्माण केले आहे.



वृक्षारोपणप्रसंगी अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी यांच्यासह राज्य राखीव पोलिस बलाचे जवान.

त्यांच्या कामाची दखल राज्य शासनाने घेतली असून, महसूल आणि वन विभागाच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार नुकताच त्यांना जाहीर झाला आहे. राज्यातील सामाजिक वनीकरणाच्या वनेतर क्षेत्रातील वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाच्या कार्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यामध्ये राज्यस्तर आणि विभागस्तर असे दोन्ही पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, स्मृतीचिन्ह व प्रशिस्तीपत्रक असे या पुरस्काराचे स्वरूप असून, लवकरच तो सन्माननीय व्यक्तींच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

२०१७ मध्ये राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक एकचे तत्कालीन समादेशक म्हणून सुनील फुलारी कार्यरत होते. त्या वेळी त्यांनी या ठिकाणी विविध प्रकारच्या तब्बल ४ हजार ११२ वृक्षांची लागवड केली. केवळ लागवड न करता, त्यातील ९२ टक्के रोपे जगवली असून, त्यांचे आज डेरेदार वृक्षात रूपांतर झाले आहे. यासाठी फुलारी यांनी गटातील कर्मचाऱ्यांसोबतच विविध सामाजिक संस्थांची मदत घेतली. लागवड केलेल्या वृक्षांची योग्य पद्धतीने जोपासना व्हावी यासाठी त्यांनी येथील जमिनीच्या क्षेत्राचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी मृदा संवर्धनाच्या प्रकल्पासून ते रेन वॉटर हार्वेस्टिंग, शेततळी यांसारखे प्रकल्प हाती घेतले. याच कालावधीत त्यांनी वडाचीवाडी हे गाव वृक्ष लागवडीसाठी दत्तक घेतले. या ठिकाणी त्यांनी गावकऱ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेत, जनजागृती केली व मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले.

सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे परिसरात पाण्याची टंचाई निर्माण होते. या टंचाईचा सामना करण्याची ताकद माणसांत असते, मात्र मुक्या प्राण्यांना अनेकदा वेदना सहन कराव्या लागतात. डोंगराळ भागातील पाण्याचे नैसर्गिक स्त्रेत आटल्यामुळे प्राणी, पक्ष्यांना भटकंती करावी लागते ती या उपक्रमाच्या माध्यमातून थांबवण्यास हातभार लागला. गट परिसरासह वडाचीवाडी परिसरात केलेल्या वृक्षारोपण आणि जलसंधारणाच्या कामामुळे पक्ष्यांच्या अधिवासात मोठी वाढ झाली असून, प्राण्यांच्या पाण्याची देखील सोय झाली. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून त्याच कालावधीत फुलारी यांनी दोन्ही ठिकाणची पक्षी गणना करून घेतली. त्यामध्ये २६ प्रकारच्या पक्ष्यांच्या विविध जातीमधील तब्बल १ हजार १५० पक्षी परिसरात आढळून आले. त्यामुळे परिसरातील लोकांना विविध प्रकारच्या पक्ष्यांची ओळख झाली.

शहरातील तरुण मुलांनादेखील निसर्गाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांनीसुद्धा वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात भाग घ्यावा यासाठी गट क्रमांक एकमध्ये फुलारी यांनी एसआरपीएफच्या वर्धापनदिनानिमित्त शैक्षणिक सहली, मैत्री अभियान, समर कॅम्प अशा अभिनव उपक्रमांचे आयोजन केले.

सदरच्या पुरस्कारासाठी राज्य शासनाच्या वतीने निर्धारित केलेल्या अटी व नियमानुसार वनीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. त्यानंतर योग्य व्यक्ती आणि संस्था यांची निकषांच्या आधारे निवड केली जाते.

सुनील फुलारी पोलिस दलातील जबाबदारी पार पाडत असतानाच आपले निसर्गाप्रती देखील काही तरी देणे लागते या विचाराने पर्यावरण संवर्धनाच्या कार्यक्रमात सतत सहभाग घेत असतात. सध्या पुणे येथे कार्यरत असताना देखील ते येथील अनेक सामाजिक संस्थांच्या माध्यमातून काम करत आहेत. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होते आहे.

Pune Mirror - 31 July, 2019

# Women cops chase dream jobs in Pune

## Reskilling to acquire specialised acumen, they are eyeing postings in bolder roles and departments

Ujjawala.Nayudu
@timesgroup.com
TWEETS @Ujjawala_Mirror

Women with the Pune police corps are now gearing up to shatter the glass ceiling, no longer content with being relegated to mundane "administrative" jobs at police stations or branches of lesser importance. They are arming themselves with specialised skills that can help them stake claim to new job profiles or posting of their choice.

As it happened, of the 2,320 women with Pune police ranking between constables and inspectors, about 1,322 have already trained up on specific skills of their choice, since March this year. "The women have shown immense interest and ability to acquire skills and postings that throw them into detailed investigations and handling specialised crimes. The women are sharp and entitled to the opportunity to take up branches of their choice. They are also being taught to be more assertive and aggressive where required. We offered them training in areas of their choice, so they can take up challenging posts. We want them in bold roles," Pune police commissioner K Venkatesham told *Mirror*.



(L-R) API Prema Patil credits her Mrs India event win to the training. Similarly, constables Archana Shinde and Sandhyarani Jadhav are equipped for better station management. PSI Vaishali Sajjan wants to expand her scope to solving cyber crimes

A special training centre was opened at his office on July 16. It will be training both men and women in batches of 100-150 in the different skill sets of their choice. "The women are finally getting to express their choice and this is the first step towards shaping their careers. This is removed from their earlier acceptance of whatever role was assigned to them. But now they are upgrading their acumen by acquainting themselves with new laws, the processes in registering offences, picking up investigation techniques, forensic skills, understanding rationale for acquittals and penalties, among other things," informed the training in-charge, police sub-inspector (PSI) Swati Devdhar.

The branches for training being sought include cybercrime, economic offences, bomb detection, mobile radiation detection, the managerial skills of a station house officer (SHO), beat management, registering offences, handling women and child cases, Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act, CCTV management. Devdhar herself is interested in joining the intelligence bureau.

Similarly, PSI Vaishali Sajjan, now posted at Kondhwa, wants to branch out to cyber crime. "I learnt of the kind of cases that come up in cybercrime and the investigation methods, right from basics to advanced ones. This area is witnessing maximum investigations and I was keen to learn the latest technology in detecting such crimes," she explained.

Assistant police inspector Prema Patil who made headlines after being crowned Mrs India, credits her win to the training she underwent. "In a bid to better myself in policing, I attended the training for personality development. This is critical for women police who are usually undermined. The training taught me to break out of my shell and demand skill-matched work. The training inspired me to participate in the beauty contest," she told *Mirror*.

Constables Sandhyarani Jadhav with Uttamnagar police station and Archana Shinde of Maket Yard police station, used the opportunity offered by the training to brush up on police station management. They learnt to tackle internal issues, duty allotments, absence of officials and immediate replacements — all which have equipped them to take on the duties of an SHO in future.

For PSI Vaishali Adkur, the pursuance of new skills was evoked by her posting with the economic offences wing. "Having landed in the department I felt the need to get better grip on the investigation processes in white collar crimes. I was introduced to some interesting techniques used for the probes, got an understanding of the laws existing internationally as compared to the ones in India and learnt codes to crack high-profile cases and more," she said.

There is also a changed attitude in the department as women police officers noticed that no longer are they randomly being assigned roles but are actually being consulted on their choice and basing the decision on their skills. The trainings have opened up new avenues in crime branch, cybercrime, EOW, forensics, bomb squad, intelligence bureau, anti-terrorism squads and such bold roles.

सकाळ – दि. ०७ जुलै, २०१९

# पोलिसांमुळे टळला सिलिंडरचा स्फोट

## रास्ता पेठेतील घटना ; दरवाजा बंद झाल्याने बाका प्रसंग



अनिल शिंदे



नीलेश साबळे

> **मी व माझा सहकारी अनिल शिंदे कामानिमित्त रास्ता पेठेतून जात होतो. तेव्हा एक महिला गॅलरीमध्ये उभी राहून जिवाच्या आकांताने ओरडत होती. तिला वाचविण्याचा प्रयत्न केला. थोडा विलंब झाला असता तर मोठी दुर्घटना घडू शकली असती.**
> – **नीलेश साबळे,** पोलिस कर्मचारी, समर्थ पोलिस ठाणे

**पुणे, ता. ६ :** गॅसवर कुकर ठेवून गॅलरीत पर्स अडकविण्यासाठी महिला गेली. पण दरवाजा अचानक बंद झाला. प्रयत्न करूनही तो उघडला नाही. दुसरीकडे कुकरमधील भाताचा जळालेला वास बाहेर येत होता. कोणत्याही क्षणी कुकर व गॅस सिलिंडरचा स्फोट होण्याची शक्यता होती. तेवढ्यात समर्थ ठाण्याचे दोन पोलिस कर्मचारी एअर कंडिशनर बॉक्स व स्लॅबला धरून गॅलरीत पोचले. त्यांनी महिलेस धीर दिला. मोठ्या प्रयत्नांनी दरवाजा उघडला आणि क्षणार्धात गॅस बंद केला. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

नीलेश साबळे व अनिल शिंदे, अशी पोलिसांची नावे आहेत. रास्ता पेठेतील युनिटी कॉम्प्लेक्सच्या पहिल्या मजल्यावर रजनी समीर झेंडेवाले या पती व मुलांसमवेत राहतात. गुरुवारी साडेबारा वाजता त्या स्वयंपाक करीत होत्या. गॅसवर कुकरमध्ये वरणभात लावून त्या गॅलरीमध्ये पर्स अडकविण्यासाठी गेल्या. तेव्हा दरवाजा बंद झाला. पावसाच्या पाण्याने तो फुगल्यामुळे उघडला नाही. तोपर्यंत कुकरच्या १०-१२ शिट्ट्या झाल्या. कुकरमधील भात जळून त्याचा वास सर्वत्र पसरला होता. गॅस तत्काळ बंद न केल्यास कुकरचा व त्यानंतर गॅस सिलिंडरचा स्फोट होण्याची शक्यता होती. तेव्हा पोलिस कर्मचारी नीलेश साबळे आणि अनिल शिंदे रास्ता पेठेतून जात होते. त्यांना एक महिला गॅलरीत घाबरलेल्या अवस्थेत उभी असल्याचे दिसले. त्यांनी तातडीने घरात पोचून पुढील अनर्थ टाळला.

# गॅलरीत अडकलेल्या महिलेची सुखरूप सुटका

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे दुर्घटना टळली

**पुणे : प्रतिनिधी**

गॅसवर कुकर लावून गॅलरीत गेल्यानंतर अचानक गॅलरीचा दरवाजा बंद झाल्याने तेथे अडकलेल्या महिलेची पोलिसांनी सुखरूप सुटका केली. कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली.

रास्ता पेठेतील युनिटी कॉम्प्लेक्समध्ये रजिन झेंडेवाले या कुटुंबीयांसह राहतात. पहिल्या मजल्यावर त्यांचा फ्लॅट आहे. गुरुवारी दुपारी त्या स्वयंपाक करत होत्या. या वेळी गॅसवर कुकर लावून त्या गॅलरीत आल्या; परंतु अचानक गॅलरीचा दरवाजा बंद झाला. यामुळे त्या गॅलरीतच अडकून पडल्या. त्यांनी बराच प्रयत्न केला; मात्र दरवाजा उघडला नाही. तोपर्यंत कुकरच्या दहा ते बारा शिट्या झाल्या होत्या. कुकरचा वास मोठ्या प्रमाणात येत होता. त्यांनी रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना मदतीसाठी आवाज दिला; पण वास मोठ्या प्रमाणात सुटल्याने त्यांच्या मदतीला कोणीही आले नाही.

त्याच वेळी समर्थ पोलिस ठाण्यातील शिपाई नीलेश साबळे व अनिल शिंदे हे तेथून जात असताना त्यांना गर्दी झाल्याचे दिसले. चौकशी केल्यानंतर झाला प्रकार समजला. या वेळी साबळे हे भिंतीला लावलेल्या एसी कुलरच्या बॉक्सवर पाय ठेवून गॅलरीत पोहोचले. त्यांनी दरवाजाला धक्का मारून तो दरवाजा उघडला. झेंडेवाले यांना धीर देऊन त्यांना प्रथम गॅस बंद करण्यास सांगितले. झेंडेवाले यांचे पती रात्री घरी आल्यानंतर त्यांनी हा प्रकार त्यांना सांगितला. या वेळी दाम्पत्य समर्थ पोलिस ठाण्यात आले आणि त्यांनी त्या पोलिस कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २१ जुलै, २०१९

# पोलिसांच्या दक्षतेमुळे वाचले प्राण

## हडपसर-मुंढवा रस्त्यावरील प्रकार



सचिन हानवते



प्रवीण ढोण

म. टा. प्रतिनिधी, हडपसर

सकाळची वेळ...वर्दळीच्या मुंढवा उड्डाणपुलावर वाहनांची गर्दी... आणि अशातच एका टेम्पोचालक तरुणाला हृदयविकाराचा झटका आला...त्याने टेम्पो जागीच थांबवला मात्र, तोपर्यंत त्रास वाढल्याने त्याने स्टीअरिंगवरच मान टाकली. सुदैवाने हा प्रकार शेजारून जाणाऱ्या एका नागरिकाने पाहिला आणि त्वरित तेथे थांबलेल्या पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनीही वेळ न दडवता त्या तरुणाला रुग्णालयात दाखल केल्याने त्याचा जीव वाचला. हा प्रकार शनिवारी सकाळी हडपसर-मुंढवा रस्त्यावर धडला.

दिगंबर माने



तरुणाला रुग्णालयात नेताना पोलिस कर्मचारी.

मयूर जाधव (वय २५, रा. लोहगाव) असे टेम्पोचालकाचे नाव आहे. हडपसर पोलिस ठाण्याचे शिपाई प्रवीण ओंकार ढोण आणि सचिन बाबुराव हानवते यांनी प्रसंगावधान राखून तरुणाला त्वरित मदत केल्याचे त्यांचे कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी मयूर भाजी घेऊन शेवाळवाडी येथील मंडईला जात होता. टेम्पोच्या मागे त्याची आजी बसली होती. मुंढवा उड्डाणपुलावर टेम्पो आला असताना मयूरला अचानक त्रास होऊ लागला. त्याने भर रस्त्यात टेम्पो थांबवला. मात्र, त्यातच त्याला हृदयविकाराचा झटका आल्याने तो स्टीअरिंगवर पडला. हा प्रकार तेथून जाणाऱ्या एका नागरिकाने पाहिला आणि चौकात पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना याची माहिती दिली. पोलिस शिपाई प्रवीण ढोण यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेऊन मयूरला शेजारील आसनावर बसवले आणि स्वतः टेम्पो चालवून रुग्णालयात नेऊ लागले. मुंढवा-मगरपट्टा मार्गावर वाहतूक कोंडी असल्याने सचिन हानवते यांनी टेम्पो समोर पोलिस सायरन असलेली दुचाकी चालवत रस्ता मोकळा करून दिला. 'मयूरला रुग्णालयात आणण्यास आणखी पाच मिनिट जरी उशीर झाला असता तर, जीवाला धोका पोहचला असता. तो वेळेवर रुग्णालयात दाखल झाल्याने त्याचा जीव वाचला आहे,' असे डॉक्टरांनी सांगितले.

# पोलीस अधिकारी मिसेस इंडिया

**पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या प्रेमा पाटील. त्यांनी रॅम्पवर पाय ठेवला आणि रिनिंग मिसेस इंडिया ही स्पर्धाही जिंकली. पोलिसांतला शिस्तीतला जॉब ते नाजूकसाजूक चमचमता रॅम्प हा स्वप्नांचा प्रवास कसा जमला, याविषयी ही विशेष मुलाखत..**





लहानपणी स्वप्नं सगळेच पाहतात. ती खरी होतील असंही मनात असतंच; पण मोठं होता होता, काही स्वप्न डोळ्यातून पुसली जातात, तर काही निसटून जातात.

मात्र आपल्या स्वप्नांवर भरवसा असेल तर ती स्वप्नंही आपल्याला साथ देतात. नुसतं हिरमुसून न जाता, मनात न कुढता प्रयत्नपूर्वक ती स्वप्न प्रत्यक्षातही उतरवता येतात.

त्याच जिद्दीचं एक खणखणीत उदाहरण म्हणजे, पुणे पोलीस दलातील विशेष शाखेच्या सहायक पोलीस निरीक्षक प्रेमा विघ्नेश पाटील.

त्यांनी एक अशी कामगिरी केली आहे की, त्यामुळे अनेकांचा आपल्या स्वप्नांवरचा आणि ते पूर्ण करण्याच्या प्रयत्नांवरचा विश्वास वाढीस लागावा. इन्स्पेक्टर प्रेमा यांनी व्यावसायिक मॉडेल्सना मागे टाकून अलीकडेच 'रिनिंग मिसेस इंडिया २०१९' हा किताब पटकावला आहे.

सांगलीतील पलूसजवळील पुणदी या लहानशा गावाच्या असलेल्या प्रेमा. त्या फक्त सुंदर नाही तर बुद्धिमान, कर्तव्यनिष्ठही आहेत. २०११ पासून त्या पोलीस दलात काम करतात. त्यांच्या घरी अत्यंत साधं वातावरण होतं. घरात कोणीही मॉडेलिंग करणं तर लांबच, पण फॅशन शोही कधी प्रत्यक्ष बघितला नव्हता. महावितरणमध्ये त्यांचे वडील नोकरीला होते. आई गृहिणी आणि दोन भाऊ. सासरी पती विघ्नेश आणि दोन वर्षांचा मुलगा रणविजय. पोलीस दलात त्या नोकरीला लागल्या. मात्र कुणाही सामान्य मुलीला असणारी उत्तम दिसण्याची आवड त्यांनाही होती. अर्थात, आपण अशा कुठल्या स्पर्धेत भाग घ्यावा असा विचारही त्यांच्या मनात कधी आला नव्हता. त्यांच्या पतीने आग्रह केला म्हणून फेसबुकवरुन त्यांनी या स्पर्धेसाठी नोंदणी केली; पण ही नोंदणी तर फक्त सुरुवात होती एका मोठ्या प्रवासाची. महिला पोलीस कठोर असतात हा विचारही त्यांना यातून मागे टाकायचा होता.

त्यानंतर फोनवरुन मुलाखती झाल्या आणि प्रत्यक्ष तीन दिवसांचे ग्रुमिंग सेशन झाले. त्यांना अगदी कसे चालायचे, हसायचे कसे असे अनेक नियम सांगण्यात आले. एकदा ठरलं की ते तडीस न्यायचंच या स्वभावानुसार मग प्रेमा यांनीही ही स्पर्धा मनावर घेतली. उंच टाचांचे सँडल्स घालायचा सराव तर त्यांना अजिबात नव्हता. सगळा पोलीस कडक शिस्तीतला आजवरचा वावर. पण त्यांनी मग अगदी घरातही हिल्स घालून चालण्याचा सराव केला. कोरिओग्राफरकडून जुजबी नृत्यही त्या शिकल्या. एकापाठोपाठ होणाऱ्या फेऱ्या त्यांनी लीलया पार केल्या आणि अखेर स्पर्धेचा दिवस उजाडला. अंतिम स्पर्धकांमध्ये त्यांच्यासह मातब्बर स्पर्धक होते. परीक्षकांनी विचारलेला शेवटचा प्रश्न होता तुमचा स्टाइल आयकॉन कोण आहे? त्यावर क्षणाचाही विलंब न करता त्यांनी उत्तर दिले किरण बेदी. मी त्यांना बघूनच पोलीस दलात आले. ..

> प्रेमा सांगतात, 'आजवरच्या प्रवासात दोन पुरुष माझ्यापाठी खंबीरपणे उभे राहिले. एक म्हणजे वडील आणि दुसरे पती. वडिलांनी त्यांच्या पोलीस दलात काम करण्याच्या इच्छेला मान दिला, तर पतीने स्पर्धेच्या वेळी तू हे करु शकतेस असा विश्वास दिला.' ही स्पर्धा जिंकल्याचे समजल्यावर संपूर्ण पोलीस दलाने त्यांचे कौतुक केले आहे. अनेक अधिकाऱ्यांनीही अगदी आपुलकीने आणि अभिमानाने अभिनंदन केले. त्याचाही त्यांना विशेष आनंद आहे.

स्पर्धा संपली आणि त्या विजेत्या ठरल्या. याशिवाय वुमन विथ सबस्टन्स या किताबानेही त्यांना गौरविण्यात आले.

या प्रवासाविषयी त्या म्हणतात, प्रत्येकीने स्वत:साठी वेळ देण्याची गरज आहे. सोशल मीडिया, डाएट अशा दिखाऊ गोष्टींपेक्षा स्त्रीने तिच्यासाठी जर वेळ दिला तर तिला काहीच अवघड नाही. मी अनेक वर्षांपासून नियमित व्यायाम करते. अगदी मला आवडेल त्या प्रकारात करते. अनेकदा आम्हाला २४ तासही काम करावं लागतं; पण व्यायाम आणि स्वत:साठी वेळ देणं थांबवलं नाही. स्वत:शी संवाद सुरुच ठेवला आणि इथंपर्यंत पोहोचले. शेवटी आयुष्य एकदाच मिळतं मग त्यात आवडत्या गोष्टींना का मिस करायचं? जी स्त्री सगळ्या जगाचा गाडा चालवते तिच्या अफाट इच्छाशक्तीपुढे आकाशही झुकू शकतं. गरज फक्त आपल्या एका संकल्पाची आहे.

तोच संकल्प त्यांनी केला आणि एका वेगळ्या जगातही आपला ठसा उमटवला...

**नेहा सराफ**

(नेहा लोकमत ऑनलाइन पुणे आवृत्तीत कार्यरत आहे.)
*neha25saraf@gmail.com*

सकाळ – दि. २३ जुलै, २०१९

# पोलिसांनी वाचविला तरुणाचा जीव

**पुणे, ता. २२ :** नैराश्य आल्याने एका तरुणाने राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, तत्काळ दाखल झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी तरुणाचे प्राण वाचविले. ही घटना सोमवारी पहाटे कर्वेनगर परिसरात घडली.



**महेश बोयने**



**देवाशिष धोंगडे**



**प्रतीक मोरे**

कर्वेनगरमधील मावळेआळी येथे राहणाऱ्या तरुणाने सोमवारी पहाटे कुटुंबातील सर्वजण झोपल्यानंतर खोलीचा दरवाजा बंद केला. त्यानंतर त्याने घराच्या छताला ओढणी बांधून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी अचानक जाग आलेल्या आईने खिडकीतून हा प्रकार पाहिला. त्यांनी बाहेरून आवाज देत त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने प्रतिसाद दिला नाही. अखेर आईने कर्वेनगर पोलिस चौकीमध्ये धाव घेतली. त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना माहिती दिली.

पोलिस कर्मचारी प्रतीक मोरे, महेश बोयने, देवाशिष धोंगडे व सुरवसे यांनी घटनास्थळी धाव घेतली. खोलीचा दरवाजा तोडून गळफास घेतलेल्या तरुणाचे पाय एका कर्मचाऱ्याने उचलून धरले. दुसऱ्या कर्मचाऱ्याने गळ्यातील ओढणी कात्रीने कापली. त्याला दुचाकीवर बसवून रुग्णालयात हलविले. उपचार केल्यानंतर तो शुद्धीवर आला. मुलाचे प्राण वाचविल्याबद्दल कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.